संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
अग्रलेखांचा बादशहा नवा काळ
नवा काळ
।। न मे भक्त: प्रणश्यति ।।
अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# उंबरा ओलांडून अंबरापर्यंत गेलेली आजची स्त्री

समाजातला प्रमुख घटक असलेल्या महिला वर्गाची समानता ही जर कोणाच्या सहानुभूतीवर अवलंबून असेल तर ती कधीच प्राप्त होणार नाही. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे महोत्सव भरवले जातात. चर्चा परिसंवाद आणि भाषणांचा रतिब घातला जातो. प्रत्यक्षात वस्तुस्थिती मात्र खूपच वेगळी असते. आज एकवीसाव्या शतकात वावरतानाही स्त्रीला आपल्या मूलभूत हक्कांसाठी लढावे लागते.स्त्रीमुक्ती हा विषय आता खूप मागे पडला आहे. आता स्त्री स्वत:च्या शक्तीवर समानतेचा हक्क मागू लागली आहे आणि तो आज ना उद्या दिल्याशिवाय समाजाला पर्याय नाही. एकेकाळी घराच्या उंबरात वावरणारी आणि आयुष्यभर पाळण्याची दोरी ओढणारी स्त्री आज अंतराळातल्या भराऱ्या घेत आहे. विमान चालकापासून ते मेट्रोचे ड्रायव्हिंग करण्यापर्यंत स्त्रीच्या कर्तृत्वाचे नवे धुमारे जगासमोर येत आहेत. ही जर तिच्या कर्तृत्वाची ओळख असेल तर केवळ स्त्री म्हणून तिला दुय्यम वागणूक देणे समाजाची आत्मवंचना ठरते. कोणत्याच क्षेत्रामध्ये स्त्री आज मागे राहिलेली नाही. राजकारण समाजकारण किंवा अर्थकारणामध्येसुध्दा आपल्या स्वतंत्र प्रतिभेचा ठसा उमटवून स्त्रीने प्रतिष्ठा प्राप्त केली किंबहुना तिच्या या विविध गुणांचा आणि सुप्त शक्तीचा समाजाला निश्चितच फायदा होत आहे. राजकारणामध्ये तेहतीस टक्के जागा स्त्रियांसाठी राखून ठेवल्या गेल्या. महाराष्ट्रासारख्या राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पन्नास टक्के जागा महिलांना दिल्या जातात. राजकारणात समान हिस्सा देण्याचा महाराष्ट्राचा पुढाकार हा निश्चितच अभिमानाचा ठरतो. मात्र याच्या उलट परिस्थिती अजूनही महिलांच्या बाबतीत प्रकर्षाने जाणवते. प्रामुख्याने कुटुंबामध्ये तिला दिली जाणारी दुय्यम वागणूक, साक्षरतेमध्ये मागे पडणारी महिला आणि दिवसेंदिवस वाढत जाणारे तिच्यावरचे अत्याचार या सगळ्या गोष्टी महिलांबाबत कुठेतरी अनास्था दाखवणाऱ्या ठरतात. अनेक प्रकारच्या सरकारी योजना जाहिर होतात. पण अत्याचाराच्याबाबतीत महिला हीच जर त्याची सर्वाधिक बळी ठरत असेल तर मुळातच चुकीचे निर्णय घेतले जात आहेत. कृती आणि व्यवहार यामध्ये मोठा फरक पडत आहे, असे म्हणण्याशिवाय पर्याय उरत नाही. स्त्री शक्तीतून आपल्या कृतीचा परिचय होत असतो. स्वत:च्या ताकदीवर आव्हाने पेलण्याची क्षमता अनेक क्षेत्रांमध्येही महिला दाखवत असतात.असे असताना अजूनही तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा सन्मानाचा नाही हे स्पष्टपणे दिसून येते.

### सहानुभूती नको कृती हवी

आपल्या महाराष्ट्राबाबत बोलायचे तर आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रातल्या स्त्री सुधारणा चळवळींचाच आढावा घेतला गेला पाहिजे. देशातली पहिली मुलींची शाळा सुरू झाली ती महाराष्ट्रात आणि ती सुरू करण्याचे धाडस देखील सावित्रीबाई फुलेंसारख्या महिलेने दाखवले होते. शिवाजीला घडवणारी जिजामाता, पंडिता रमाबाई किंवा आदिवासी पाड्यांवर जाऊन काम करणाऱ्या अनुताई वाघ, लक्ष्मीबाई टिळक किंवा पहिली डॉक्टर होण्याचा मान मिळवणाऱ्या आनंदीबाई जोशी अशी कितीतरी उदाहरणे या महाराष्ट्राच्या नावलौकिकात भर घालतात. अगदी प्राचीन काळातसुध्दा जनाबाई, मुक्ताई सारख्यांनी आपल्या प्रतिभेचा प्रभाव दाखवला. बहिणाबाई सारख्यांनी महिलेला कराव्या लागणाऱ्या कष्टाचे वर्णन आपल्या कवितांमधून केले आणि तीच स्त्री ही समाजालाच आधार आणि आकार देऊ शकते, याचीही ग्वाही दिली.म्हणूनच आज असे ठामपणे म्हणावे लागते की, स्त्रीला आता सहानुभूतीची गरज उरलेली नाही.आणि प्रगतीची प्रत्यक्ष कृतीच तिला अपेक्षित आहे. याच महाराष्ट्राने देशातले पहिले महिलाविषयक धोरण जाहीर केले. यावर्षी दुसरे महिलाविषयक धोरणही प्रसिध्द झाले आहे. परंतु गेल्या वीस-पंचवीस वर्षांच्या प्रवासात राज्यातल्या तीस टक्के महिलासुध्दा आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊ नयेत ही केवढी मोठी शोकांतिका ठरते. आज तिच्यामध्ये अनेक प्रकारच्या कल्पना आणि कौशल्य असल्याचे सिध्द झाले आहे.तिला योग्य प्रोत्साहन मिळाले तर ती कोणतेही आव्हान पेलण्याच्या मनस्थितीत दिसून येईल. हे महिलाविषयक धोरण जाहीर करताना स्त्रीला उद्योजिका करण्याच्या दिशेने कोणतीच पावले सरकारने टाकलेली नाहीत. करियर आणि घर या दोन टोकांवर राहून आपल्या जीवनाची कसरत करणारी महिला या परिघातून बाहेर पडली पाहिजे. स्वत:च्या करियरचा विचार करताना आपण अन्य शंभर महिलांना रोजगार देण्याचा विचार तिने केला पाहिजे. महिला बचतगट योजना चांगली असूनही ती एका ठरावीक वर्तुळातच फिरत राहिली आहे. त्या गटातल्या पाच-दहा महिलांनी दरवर्षी एकेक कोटीचा मोठा व्यवसाय उभारण्याची जिद्द दाखवली पाहिजे. तंत्रज्ञानाचा वापर करून आजच्या वेगवान युगात ती अधिक वेगाने पुरुषाइतकीच कमाई करू शकते. नफा कमाऊ शकते. उद्योगधंदा व्यवसाय उभारू शकते.

### स्त्रीत्वाचा सन्मान आवश्यक

दुर्दैवाने ही वस्तुस्थिती देखील मान्य करावी लागते. समाजातल्या ऐंशी टक्के महिलांना घर आणि करियर यातच अडकून पडावे लागलेले आहे. घरच्या जबाबदाऱ्या तिला टाळता येत नाहीत. परंतु हा प्रकार किती दिवस चालणार याचा आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने नक्कीच विचार झाला पाहिजे. जगातल्या अन्य देशातल्या महिला घर प्रपंचाच्या चक्रव्यूहात स्वत:ला फार काळ अडकवून घेत नाहीत. ही जबाबदारी सांभाळून अनेक नव नवी क्षितिजे पार करत असतात. सरकारी पातळीवर महिलांच्या या कर्तृत्वाला संधी देणाऱ्या योजना राबवल्या पाहिजेत. तिला योग्य त्या रजा आणि सुट्ट्यांच्या बरोबर खिशातल्या कौशल्याला वाव देण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. चूल आणि मूल हा सगळा विषय आता इतिहासजमा झालेला आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे जग इतके जवळ आले आहे की, स्त्री आणि पुरुष या दोघांच्याही प्रतिमेचे जगाला नेहमीच नवीन दर्शन घडत असते. त्याचवेळी आजच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांमधून स्त्रीची रंगवली जाणारी प्रतिमा बदलण्याची गरज आहे. टीव्ही सीरियल्समधून वेगवेगळ्या फॅशन शोमधून किंवा रिॲलिटी शोमधून स्त्रीचे विकृत चित्रण केले जाते. त्याला स्त्रीकडूनच कठोर विरोध झाला पाहिजे. आज एक मोठे आव्हान पेलण्याची शक्ती स्त्रीमध्ये जर असेल तर तिने हा अपमान का सहन करायचा असा प्रश्न निर्माण होतो, म्हणूनच त्याचा विचार झाला पाहिजे.